# आकाशवाणी पुणे
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 05.55 वा.

**दिनांक- 02.02.2023** **वार – गुरुवार**

---

**पिफ-जळुकर**

पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचं उद्घाटन मुकुंदनगर इथल्या थिएटर अकादमीत आज होत आहे. इराणी दिग्दर्शक अली अब्बासी यांनी दिग्दर्शित केलेला होली स्पायडर हा पर्शियन भाषेतील चित्रपट उद्घाटनाच्या सत्रात दाखवण्यात येणार आहे. भारतीय चित्रपट संगीतातील उल्लेखनीय योगदानासाठी ज्येष्ठ गायिका उषा मंगेशकर यांना या महोत्सवात एस.डी.बर्मन पुरस्कार दिला जाणार आहे.

**डॉ. श्रीधर केतकर जयंती**

मराठीतला पहिला ज्ञानकोश निर्माण करणारे डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर यांची 139 वी जयंती आज, पुण्यात कमला नेहरू पार्क मधील त्यांच्या समाधीस्थळी साजरी करण्यात आली. अखिल भारतीय साहित्य परिषद आणि केतकर कुल महासभेतर्फे या कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं. केतकर यांनी अथक प्रयत्नांनी मराठीतला पहिला ज्ञानकोश निर्माण केला. मराठीला ज्ञानभाषा बनवण्यासाठी त्यांनी महत्वाचं योगदान दिलं. त्यांचं चरित्र आजही प्रेरणादायी आहे असं अखिल भारतीय साहित्य परिषदेचे अध्यक्ष प्रा. श्याम भुर्के यावेळी म्हणाले.

**एनसीसी पथक**

नवी दिल्लीतल्या प्रजासत्ताक दिन संचलनात सलग तिसऱ्या वर्षी पंतप्रधान बॅनर विजेत्या राष्ट्रीय छात्र सेनेच्या अर्थात एनसीसीच्या महाराष्ट्र पथकाचा उद्या पुण्यात सन्मान करण्यात येणार आहे. पुण्यातील एनसीसीच्या मुख्यालयात हा कार्यक्रम होणार आहे.

**सत्यशोधक समाज परिषद**

सासवड इथं येत्या रविवारी, 5 फेब्रुवारीला सत्यशोधक समाज परिषद होणार आहे. स्वागताध्यक्ष संभाजीराव झेंडे आणि ज्येष्ठ समाजवादी नेते रावसाहेब पवार यांनी आज पुण्यात पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. सत्यशोधक समाज स्थापनेच्या शतकोत्तर सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त संस्थापक महात्मा फुले यांची जन्मभूमी आणि कर्मभूमी असलेल्या सासवड इथल्या आचार्य अत्रे सांस्कृतिक भवनात ही परिषद होणार आहे.

**<u>ग्रंथालय अधिवेशन</u>**

पुणे विभागीय आणि पुणे जिल्हा ग्रंथालय अधिवेशन 5 मार्च रोजी सासवड इथं आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष विजय कोलते आणि प्रमुख कार्यवाह सोपानराव पवार यांनी आज दिली. या अधिवेशनात ग्रंथदिंडी, साहित्यिकांचा मेळावा, ग्रंथ प्रदर्शन, परिसंवाद आदी कार्यक्रम होणार आहेत तसंच ग्रंथालयाच्या विशेष अधिवेशन स्मरणिकेचं प्रकाशन आणि आदर्श कार्यकर्ता, आदर्श ग्रंथालय, आदर्श ग्रंथपाल आदी पुरस्कारांचं वितरण होणार आहे.

**<u>लष्कर दंत चिकीत्सा</u>**

लष्कराच्या दंत चिकित्सा विभागाचा 82 वा स्थापना दिवस काल साजरा करण्यात आला. यानिमत्त पुण्याच्या दंत चिकित्सा विभागाचे प्रमुख मेजर जनरल सुजित कुमार भंडारी यांच्या हस्ते युद्ध स्मारकावर पुष्पचक्र अर्पण करण्यात आलं.

**<u>मनपा कारवाई</u>**

जानेवारी महिन्यात पुणे महानगरपालिकेनं नदी पात्र, नदीकडेच्या खासगी जागा आणि टेकड्यांवर राडारोडा टाकणाऱ्या 19 जणांवर कारवाई करुन 83 हजार रूपयांचा दंड वसूल केला आहे.

**<u>कोयता गँग</u>**

पुण्यातील कोयता टोळीला रोखण्यासाठी शहर पोलिसांकडून विविध उपाय योजना केल्या जात असून त्याचाच एक भाग म्हणून आता कोयता खरेदी करणाऱ्याला आपल्या आधार कार्डची माहिती संबंधित विक्रेत्याला द्यावी लागणार आहे. कोयता हा प्रामुख्यानं शेती कामासाठी आणि नारळ सोलण्यासाठी वापरला जातो, त्यामुळं शेतीकामासाठी त्यांची खरेदी करुन गुन्हेगारीसाठी कोयत्यांचा वापर करणाऱ्यांना या निर्णयामुळं चाप बसेल असा विश्वास पोलीस विभागाकडून वर्तवण्यात आला आहे. याशिवाय 450 बीट मार्शलची शहरात अहोरात्र गस्त घालण्याचा निर्णय देखील घेण्यात आला आहे.

**<u>जगदीश मुळीक</u>**

वडगावशेरी मतदार संघातल्या नगर रस्त्यावर खराडी आणि विश्रांतवाडी इथल्या मंजूर करण्यात आलेल्या उड्डाण पुलाचं काम निधीची तरतूद करून लवकरात लवकर सुरू करावं अशी

मागणी भाजपचे शहराध्यक्ष जगदीश मुळीक यांनी पुणे महापालिका आयुक्त विक्रम कुमार यांच्याकडे केली आहे. यावेळी आयुक्तांनी लवकरच काम सुरू करण्याचं आश्वासन दिलं.

**बुद्धीबळ**

महाराष्ट्र राज्य बुद्धिबळ संघटना आणि पुणे जिल्हा बुद्धिबळ सर्कल यांच्या मान्यतेनं आयोजित 14 व्या राज्यस्तरीय जलद बुद्धिबळ स्पर्धेत 14 वर्षांखालील गटाचं विजेतेपद शर्विल चौरीडुले यानं पटकावले. शर्विलने सात फेऱ्यांअखेर साडेसहा गुण मिळवत हे यश मिळवलं. दहा वर्षांखालील गटात ओम रामगुडेनं सहा गुणांसह जेतेपद पटकावलं.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज आकाश निरभ्र होतं. कमाल तापमान 30 तर किमान तापमान 13 पूर्णांक 9 दशांश अंश सेल्सिअस नोंदवण्यात आलं. उद्याही आकाश निरभ्र असेल आणि तापमानात फारसा बदल संभवत नाही असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**तर हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू संध्याकाळी 5 वाजून 55 मिनिटांनी विविध भारती पुणे केंद्रावर, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये. नमस्कार.**